दैनिक

अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

॥ आजचा सुविचार ॥

सामान्य दिसणारे लोकच
जगात सर्वात चांगले लोक असतात.
म्हणूनच देव अश्या
लोकांनाच जास्ती निर्माण करतो.

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ९१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१३ नोव्हेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

मराठवाड्यात वाढती चिंता, लघु प्रकल्पांनी गाठला तळ !

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१२, छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात पाणी साठ्याची परिस्थिती चिंताजनक असून एकूण ९३१ प्रकल्पात ३७.५८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. मध्यम आणि लघु प्रकल्पात कमी पाणीसाठा असून पाणी पातळीत घट होत आहे. लहान धरणांवर अवलंबून असलेल्या गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट होण्याची शक्यता आहे. मोसमी पाऊस कमी झाल्यामुळे मराठवाड्यातील धरणात पुरेसा पाणीसाठा नाही. पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्याचे आदेश राज्य शासनाने काढलेले आहेत. नोव्हेंबर महिन्यातच पाणीसाठा कमी झाला आहे. त्यामुळे पुढील सहा महिने पाणी पुरवठा करण्याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे.


सर्वात मोठ्या जायकवाडी धरणातील पाणी सिंचनासाठी आणि पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विभागातील मोठ्या धरणात ५१.८५ टक्के पाणीसाठा आहे. ८१ मध्यम प्रकल्पात १७.२५ टक्के आणि ८०६ लघु प्रकल्पात १३.७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. विभागातील एकूण ९३१ प्रकल्पात ३७.५८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे, अशी माहिती जलसंपदा विभागाने दिली आहे.

कुठे किती पाणीसाठा शिल्लक?

चार जिल्हे अवलंबून असलेल्या जायकवाडी धरणात ६९.७४ टक्के पाणीसाठा आहे. मजलगाव १९.६२ टक्के, मांजरा ४.८९, सिद्धेश्वर १५.६६, येलदरी ५४.९८, विष्णुपुरी ५९.९७, निम्न दुधना १२.२६, निम्न तेरणा १७.७, निम्न मनार १७.८३ टक्के असा धरणनिहाय पाणीसाठा आहे.

या भागांमध्ये पाणीसाठाच नाही

मध्यम आणि लघु प्रकल्पासह साखळी बंधारे, कोल्हापुरी बंधारे, पाझर तलाव, शेततळे, विहिरी यात पाणीसाठा नाही. विहिरींनी तळ गाठल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.



रब्बी हंगामात पुरेसे पाणी नसल्यामुळे गहू व हरभरा ही पिके घेणेसुद्धा कठीण झाले आहे. दरवर्षीच्या तुलनेत रब्बीचे केवळ २० टक्के क्षेत्र राहण्याची शक्यता आहे.

लघु प्रकल्पात केवळ १३ टक्के पाणीसाठा

दरम्यान, लघु प्रकल्पात फक्त १३ टक्के पाणीसाठा आहे. कोरड्या लघु प्रकल्पांची संख्या जास्त आहे. एका धरणावर परिसरातील दहा ते पंधरा गावे अवलंबून आहेत. या गावांना पिण्यासाठीही पाणी मिळत नसल्यामुळे परिस्थिती गंभीर झाली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात नोव्हेंबर महिन्यातच टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. बीड, जालना, परभणी या जिल्ह्यांची स्थिती गंभीर आहे. जानेवारीनंतर पाणी टंचाईच्या झळा अधिक बसतील, असे अभ्यासकांनी म्हटले आहे.

जायकवाडीतून विसर्ग...

रब्बी हंगामासाठी जायकवाडी धरणातून पाच नोव्हेंबरपासून आवर्तन सोडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, कालव्यांच्या साफसफाईमुळे १० नोव्हेंबरपासून डाव्या कालव्यात ३०० क्युसेक विसर्ग सोडण्यात आला आहे. उजव्या कालव्यात विसर्ग सोडण्यात आलेला नाही. दोन्ही कालव्यात रब्बी हंगामात तीन आणि उन्हाळी हंगामासाठी एक आवर्तन सोडले जाणार आहे. पहिले आवर्तन सहा डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. रब्बी हंगामासाठी जमिनीत ओल नाही. सिंचनामुळे काही भागात पेरणी होण्याची शक्यता आहे.

नागपूरकरांवर १० टक्के पाणी कपातीचे सावट

अक्षराज : वृत्तसंकलन



दि.१२, नागपूर : यंदा अपुऱ्या पावसामुळे नागपूर शहरावर पाणी टंचाईचे सावट निर्माण झाले आहे. एल-निनोच्या प्रभावामुळे राज्यासह नागपूर जिल्ह्यात अपेक्षित पाऊस झाला नाही. परिणामी, शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या तोतलाडोह (पेंच) जलाशयातील पाणी साठ्यात घट झाली आहे. आगामी काळात उन्हाची तीव्रता वाढल्यास बाष्पीभवनामुळे जलसाठ्यात आणखी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील महिनाभरात शहरातील पाणी पुरवठ्यात सुमारे १० टक्क्यांनी कपात करण्यात येऊ शकते अशी शक्यता आहे.

दरम्यान, पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूरकरांना केले आहे. पाण्याची उपलब्धता आणि आगामी उन्हाळ्याचा कालावधी लक्षात घेऊन प्रशासनाकडून नियोजन केले जात आहे. यापूर्वी पाणी पुरवठ्याबाबत दोन बैठका झाल्या आहेत. पाणी साठ्याची परिस्थिती पाहता दर दहा दिवसांनी पाणी कपात लागू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता. मात्र, उपलब्ध जलसाठा आणि पावसाळ्यापर्यंतचा कालावधी लक्षात घेऊन हा निर्णय पुढे ढकलण्यात आला. त्यामुळे सध्या नियमित पाणी पुरवठा सुरू असला, तरी भविष्यातील परिस्थिती आव्हानात्मक होण्याची शक्यता आहे.

थेंब-थेंब पाणी वाचविण्याचे आवाहन

नागपूरकरांनी पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन बावनकुळे यांनी केले. नागपूर शहराला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी भोसले राजांनीही प्रयत्न केले होते. त्यामुळे शहरातील तलाव, जलस्रोत आणि सार्वजनिक मालमत्तेचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. कोणत्याही परिस्थितीत गटाराचे किंवा सांडपाणी सार्वजनिक जलस्रोतांमध्ये सोडू नये. तलावांचे खोलीकरण आणि जलस्रोतांचे संवर्धन करण्याची गरज आहे. दुष्काळी परिस्थितीत प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

सोयगाव शिवारातील शेतकऱ्यावर बाग उद्ध्वस्त करण्याची वेळ

दि.१२, सोयगाव (छ.संभाजीनगर) : निसर्गाच्या लहरीपणाचा आणि पाणीटंचाईचा फटका शेतकऱ्यांना बसू लागला असून, वर्षानुवर्षे मेहनत घेऊन जोपासलेली मोसंबीची बाग डोळ्यांदेखत उद्ध्वस्त करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. सोयगाव शिवारातील संदीप (बाप्पू) अनिल काळे या शेतकऱ्याने पाण्याअभावी आपल्या पाच एकर क्षेत्रातील तब्बल एक हजार मोसंबीची झाडे जेसीबीच्या साहाय्याने काढून टाकली. हिरवीगार बाग उजाड झाल्याचे चित्र पाहून शेतीतील पाणीटंचाईचे भीषण वास्तव समोर आले आहे.

दीप काळे यांची सोयगाव शिवारातील गट क्रमांक २५९ मध्ये पाच एकर शेती आहे. या क्षेत्रात त्यांनी मोठ्या कष्टाने सुमारे एक हजार मोसंबीची झाडे लावून बाग फुलविली होती. बागेच्या संगोपनासाठी मशागत, खते, औषधफवारणी आणि पाण्याचे नियोजन यावर त्यांनी मोठा खर्च केला. मात्र, यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने परिसरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पाण्याचे स्रोत आटत चालल्याने मोसंबीच्या बागेला आवश्यक पाणी देणे अशक्य झाले. परिणामी, झाडे वाळण्यापूर्वीच नाईलाजाने संपूर्ण बाग जेसीबीच्या साहाय्याने काढून टाकण्याचा निर्णय त्यांना घ्यावा लागला.

शेतीच नव्हे, पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर

शेतीसाठी पाणी उपलब्ध नसताना भविष्यात स्वतःच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कशी करायची, असा प्रश्नही काळे यांच्यासमोर उभा राहिला आहे. पावसाने पाठ फिरवल्याने शेतीचे नुकसान होत



दुष्काळाच्या झळा तीव्र, पिण्याच्या पाण्याचीही चिंता...

असतानाच ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. एकीकडे फळबागा वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे, तर दुसरीकडे पाण्याअभावी उभ्या बागा काढून टाकण्याची वेळ येत आहे.

पाच एकरांतील एक हजार मोसंबीची झाडे काढण्याची वेळ येणे ही केवळ एका शेतकऱ्याची व्यथा नसून, सोयगाव तालुक्यातील संभाव्य जलसंकटाची गंभीर सूचना आहे. प्रशासनाने पाणीटंचाईच्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचे नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

मुंबईतील हवेची गुणवत्ता सुधारली !

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१२, मुंबई : बुधवारी मुंबईच्या हवेच्या गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा झाल्याचे दिसले. आकाशात उडणाऱ्या फटाक्यांवर संपूर्ण नियंत्रण आले नसले, तरी फटाक्यांचे प्रमाण दिवाळी पाडव्याच्या दिवशी तुलनेने कमी होते, असे निरीक्षण अनेक मुंबईकरांनी नोंदवले. मुंबईमध्ये १० नोव्हेंबरला रात्री ८च्या सुमारास १४९, १० आणि ११ नोव्हेंबरच्यादरम्यान रात्री १२ वाजता १४३, ११ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता १३५ आणि सायंकाळी ५ वाजता १३८ निर्देशांक नोंदवला गेला. लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत हा निर्देशांक १७२पर्यंत पोहोचला होता.

मुंबईमध्ये फटाक्यांमुळे आगी लागण्याच्या घटनांमध्ये यंदा मोठी वाढ दिसली. आकाशात उडणारे फटाके घरांमध्ये जाऊन नुकसान झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या. त्यानंतर या फटाक्यांवर मुंबई महानगरपालिकेने निर्बंध आणले. याचा परिणाम दिवाळी पाडव्याच्या दिवशी दिसला. पाडव्याच्या दिवशीही इतर वेळी जोरदार फटाके वाजतात. मात्र यंदा हे फटाके कमी वाजल्याचे मुंबईकरांनी सांगितले. केंद्र सरकारच्या समीर ॲपवर दिवाळी पाडव्याच्या दिवशी रात्री ८ वाजता मुंबईच्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक १४८ नोंदवला गेला, तर रात्री १२पर्यंत तो १४३पर्यंत खाली आला. यामध्ये देवनार, कांदिवली, मालाड पश्चिम, नेव्हीनगर, शिवाजीनगर या केंद्रांवरील हवेची गुणवत्ता वाईट असल्याची नोंद झाली. ही गुणवत्ता बुधवारी दुपारपर्यंत सुधारली, मात्र मालाड पश्चिम आणि नेव्हीनगर या दोनच केंद्रांवर निर्देशांक बदलला नाही.

बुधवारी भाऊबीजेच्या निमित्तानेही सकाळपासूनच फटाक्यांना सुरुवात होईल आणि हे फटाके रात्री उशिरापर्यंत वाजत राहतील, असा अंदाज होता. मात्र रात्री आठ वाजेपर्यंत हे प्रमाण तुरळक असल्याचे दिसून आले. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी खासगी ॲपवर मुंबईच्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक ५००च्या पुढे नोंदला गेला. हा निर्देशांक पाडव्याच्या दिवशी २८६ ते ३००पर्यंत पोहोचल्याची नोंद झाली. त्यानंतर खासगी ॲपवरील माहितीनुसार, निर्देशांक बुधवारी दुपारच्या सुमारास १००च्या आत होता, असेही नोंदले गेले.

दिवाळीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात फटाके फुटणार?

अक्षराज : वृत्तसंकलन



दि.१२, मुंबई : राज्यभरात दिवाळी सणाचा उत्साह आहे. सर्वत्र उत्सवात आणि जल्लोषात दिवाळी साजरी करण्यात आली आहे. दिवाळीनंतर आता महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी काळात फटाके फुटणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे.

एकीकडे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. तर दुसरीकडे दोन्ही शिवसेनेत टोकाचा संघर्ष झालेला असतानादेखील आता या दोन्ही शिवसेना देखील एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. अर्थात या दोन्ही एकत्र येणार असल्याच्या चर्चा निर्माण होण्यामागे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे काही बड्या नेत्यांची वक्तव्ये कारणीभूत ठरली आहेत.

गेल्या आठवड्यात शिवसेनेचे नंदुरबारचे आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी दोन्ही शिवसेना एकत्र याव्यात अशी आशा व्यक्त केली होती. दोन्ही शिवसेना एकत्र आले तर तीच आमची खरी दिवाळी ठरेल, असं चंद्रकांत रघुवंशी म्हणाले. त्यांच्या वक्तव्यानंतर खासदार ओमराजे निंबाळकर यांनीदेखील दोन्ही शिवसेना एकत्र आले तर आपल्याला आनंद होईल. कार्यकर्त्यांच्यादेखील याच भावना असल्याचं ओमराजे निंबाळकर म्हणाले होते. त्यानंतर मंत्री गुलाबराव पाटील यांनी याबाबत केलेल्या एका वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना ओमराजे यांनी पुन्हा सूचक वक्तव्य केलं.

गुलाबराव पाटील नेमकं काय म्हणाले होते?

मंत्री गुलाबराव पाटील यांना दोन्ही शिवसेना एकत्र येणार का?असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर त्यांनी केलेलं वक्तव्य चर्चेला कारण ठरलं. आता मी काही सांगू शकत नाही. शेवटी मी डब्बा आहे, आमचे नेते एकनाथ शिंदे हे इंजिन आहेत. इंजिन जिकडे जाईल तिकडे डब्बा असतो. त्यामुळे आमचे इंजिन जिकडे जाईल तिकडे डब्बा जाईल, असं गुलाबराव पाटील म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यावर खासदार ओमराजे निंबाळकर आणि मंत्री भरत गोगावले यांनी प्रतिक्रिया दिली.

ओमराजे निंबाळकर काय म्हणाले?

हा सर्व वरिष्ठ नेतृत्वाचा निर्णय आहे. मला असं वाटतं की, माझ्यासारखा सामान्य माणूस फक्त इच्छा व्यक्त करु शकतो. मी माझ्या भावना मांडू शकतो. याबाबत जे काही निर्णय घ्यायचे आहेत ते दोन्ही पक्षांच्या प्रमुख माणसांनी घेणं अपेक्षित आहे. मी माझ्या भावना सांगितल्या आहेत. दोन्ही एकत्र आले तर कुणाला नकोय? माझ्यासारखा आनंदी माणूस दुसरा कोणी नसेल, असं ओमराजे निंबाळकर म्हणाले.

भरत गोगावले काय म्हणाले?

गुलाबराव पाटील हे गुलाबासारखे आहेत. त्यांनी जे काही सांगितलं, पण आताचं जे काही भवितव्य दिसत आहे, आम्हाला तरी काय तसं वाटत नाही. पण राजकारणात कधीही काही घडू शकतं. सकाळचं दुपारी कुठे आणि दुपारचं संध्याकाळी कुठे, त्यामुळे आजकाल राजकारणात काय घडेल ते सांगू शकत नाही. कदाचित गुलाबराव पाटील यांना तशी भनक लागली असेल तर त्यांना मंगळवारी विचारतो, अशी प्रतिक्रिया भरत गोगावले यांनी दिली.

शिवसेनेच्या नेत्यांची वक्तव्ये पाहता दोन्ही शिवसेना एकत्र याव्यात यासाठी पडद्यामागे खरंच काही घडामोडी सुरु आहेत का? असा प्रश्न निर्माण होतोय. याशिवाय शिवसेना पक्ष, चिन्ह प्रकरणाची सुप्रीम कोर्टातील सुनावणी अंतिम टप्प्यात आहे. या प्रकरणाचा लवकरच निकाल लागणार आहे. त्याआधी काही घडामोडी दोन्ही शिवसेनेत घडतात का? की मित्रपक्षांवर दबाव निर्माण करण्यासाठी अशी वक्तव्ये केली जात आहेत? अशी देखील चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.



मुलांनो मैदानात या

आजचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. एकविसाव्या शतकात स्मार्टफोन आणि इंटरनेट हे मानवी जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसांकडेच नव्हे, तर शाळकरी मुलांच्या हातातही आज मोबाईल दिसू लागला आहे. कोरोना महामारीच्या काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी मुलांना मोबाईल घेऊन दिले. मात्र, कोरोना संपल्यानंतरही हा मोबाईल मुलांच्या हातातून सुटलेला नाही. उलट मोबाईल हाच मुलांचा सर्वांत जवळचा मित्र बनला आहे.

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत अनेक मुले मोबाईलमध्ये गुंतलेली असतात. मोबाईलचा वापर आजच्या काळात आवश्यक असला, तरी तो गरजेपुरताच मर्यादित असणे अपेक्षित आहे. मात्र, आज अनेक मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व बनले आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल, टीव्ही, संगणक, व्हिडिओ गेम आणि सोशल मीडियावर घालवत असतील, तर त्यांच्या शारीरिक हालचाली कमी होणारच. याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर, अभ्यासावर आणि सामाजिक वर्तनावरही होत आहे. मुलांचे बालपण हरवत चालले आहे की काय, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावोगावची मैदाने मुलांच्या किलबिलाटाने गजबजून जायची. क्रिकेट, कबड्डी, खो-खो, लगोरी, लंगडी अशा खेळांमध्ये मुले रमून जायची. मात्र, आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात हीच मैदाने ओस पडल्याचे चित्र दिसत आहे. क्रिकेटचा अपवाद वगळता अनेक मैदानी खेळ खेळताना मुले फारशी दिसत नाहीत. पारंपरिक देशी खेळ तर आजच्या पिढीला माहीतही नाहीत.

गोट्या, भोवरे, विटीदांडू, आट्यापाट्या, सुरपारंब्या, लपंडाव, लगोरी, कुरघोडी, चपूल, उडाणटप्पू यांसारखे अनेक खेळ आजच्या मुलांच्या आयुष्यातून हद्दपार होत चालले आहेत. पूर्वी दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक काढणारी मुले दिसायची. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून रप्पाधप्पी खेळला जायचा. गोट्यांचा डाव रंगायचा. या खेळांमध्ये मुलांना मिळणारा आनंद अवर्णनीय होता. मात्र, आज अशा खेळांची जागा मोबाईलवरील व्हिडिओ गेम्सनी घेतली आहे.

खरे तर मैदानी खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नाहीत, तर मुलांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहेत. मैदानी खेळांमुळे शरीराचा व्यायाम होतो, शारीरिक क्षमता वाढते आणि मानसिक आरोग्यही चांगले राहते. त्याचबरोबर संघभावना, शिस्त, सहकार्य, नेतृत्व, खिलाडूवृत्ती, जिद्द आणि पराभव स्वीकारण्याची मानसिकता असे अनेक जीवनोपयोगी गुण मुलांमध्ये विकसित होतात. मोबाईलवरील खेळांमधून मनोरंजन मिळत असले, तरी प्रत्यक्ष मैदानावर खेळण्याचा आनंद आणि त्यातून मिळणारे अनुभव वेगळेच असतात.

मुलांना मैदानापासून दूर ठेवण्यात केवळ मोबाईलच जबाबदार नाही, तर खेळण्यासाठी सुरक्षित मैदाने आणि पुरेशी जागा उपलब्ध नसणे, अभ्यासाचा वाढता ताण आणि पालकांची बदललेली जीवनशैली हीदेखील काही कारणे आहेत. त्यामुळे मुलांना पुन्हा मैदानाकडे वळवण्यासाठी पालक, शिक्षक, शाळा आणि समाजातील सर्व घटकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. शाळांमध्ये खेळांसाठी पुरेसा वेळ द्यावा. गावोगावी मैदाने उपलब्ध करून द्यावीत. पालकांनीही मुलांना मोबाईल देऊन शांत बसवण्यापेक्षा त्यांच्यासोबत मैदानी खेळ खेळण्याचा प्रयत्न करावा.

- श्याम ठाणेदार

फटाक्यांचे कारखाने : रोजगाराचे साधन की मृत्यूचे सापळे ?

फटाक्यांमुळे प्रचंड हानी होते हे ज्ञात असूनही जेव्हा जेव्हा फटाक्यांवर बंदी आणण्याचा विचार मांडला जातो तेव्हा २ सूत्र प्रामुख्याने समोर येतात. त्यातील पहिले सूत्र म्हणजे फटाक्यांवर बंदी आणल्यास हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावू शकतात. मुळात फटाके फोडण्याचा उल्लेख कोणत्याही धर्मशास्त्रात किंवा धर्मग्रंथात आढळत नाही त्यामुळे फटाके फोडणे हा धार्मिक विषय असूच शकत नाही. सर्व पंथांच्या सण-उत्सवांमध्ये, मिरवणुकांमध्ये, वरातीमध्ये, विजयोत्सवामध्ये फटाके फोडले जातात.

दिवाळीत ते प्रचंड प्रमाणात फोडले जात असले तरी दिवाळी या धार्मिक सणाचा आणि फटाक्यांचा तिळमात्र संबंध नसून दिवाळीत शिरलेली ती एक अनिष्ट परंपरा आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. फटाक्यांवर बंदी न आणण्याबाबत दुसरे महत्वाचे सूत्र समोर आणले जाते ते म्हणजे फटाक्यांच्या कारखान्यात सहस्रो कामगार काम करतात. फटाक्यांवर बंदी आणल्यास त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होईल. आजमितीला अशी अनेक क्षेत्रे आहेत जी काळाच्या ओघात बंद झाली. त्या क्षेत्रातील लोकांनी रोजगाराची अन्य साधने शोधली आणि आज ते आपल्या संसाराचा गाडा समर्थपणे हाकत आहेत. देशात संगणकाचा वापर वाढला तेव्हाही हाच प्रश्न उपस्थित करण्यात आला; डिजिटल क्रांतीमुळे देशात संगणकाचा वापर प्रत्येक क्षेत्रात होऊ लागला आहे. मात्र त्यामुळे कोणाची उपासमार होऊन रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला नाही. आज अनेक क्षेत्रात एआयचा शिरकाव झाला आहे. अल्प मनुष्यबळात कित्येक कामे चुटकीसारखी होऊ लागली आहेत; मात्र आजही अशी अनेक क्षेत्रे आहेत ज्या ठिकाणी प्रत्यक्ष मनुष्याचीच गरज भासते.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी न्यायालयाने फटाके फोडण्यावर निर्बंध आणले होते तरीही यंदा फटाक्यांमुळे झालेले नुकसान गेल्या वर्षीच्या तुलनेत दुपटीने आहे. यंदा १६ फेब्रुवारीला राजस्थानमधील भिवाडी येथे सकाळी एका औद्योगिक युनिटमध्ये भीषण आग लागली. या युनिटमध्ये कागदोपत्री कपडे बनवण्याचा कारखाना असल्याचे दाखवण्यात आले होते; प्रत्यक्षात तेथे



अवैध फटाके तयार केले जात असल्याची माहिती प्रशासनाने दिली. आगीच्या वेळी कारखान्यात ११ कामगार होते त्यापैकी सात कामगारांचा होरपळून मृत्यू झाला. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी आंध्र प्रदेशातील काकीनाडा जिल्ह्यातील वेटलापलेम येथे सूर्या श्री फायरवर्क्स या फटाका कारखान्यात भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत २८ कामगारांचा मृत्यू झाला ज्यामध्ये महिलांचाही समावेश होता. अनेक कामगार गंभीररित्या घायाळ झाले. २२ एप्रिलच्या सुमारास पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील कोंसई गावात बेकायदा फटाका निर्मिती केंद्रात स्फोट झाला. या कारखान्यात ३० पेक्षा अधिक कामगार उपस्थित होते. स्फोटात २१ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर २२ वर्षीय महिलेचा उपचारासाठी ठाण्याला नेत असताना मृत्यू झाला. अन्य चार जण गंभीररीत्या घायाळ झाले. १४ मे २०२६ ला मध्य प्रदेशातील देवास जिल्ह्यातील टोंककला गावात फटाके बनवणाऱ्या कारखान्यात स्फोट झाला. कारखान्यातील कामगार दारूगोळ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रासायनिक पदार्थांचे मिश्रण करीत असताना हा स्फोट झाला. या दुर्घटनेत तीन कामगारांचा मृत्यू झाला, तर २५ जण घायाळ झाले त्यापैकी १३ जण गंभीररित्या घायाळ झाले होते. १८ जुलै २०२६ ला गुजरातमधील कर्णावतीच्या रामोल परिसरात अवैध फटाका निर्मिती केंद्रात भीषण स्फोट झाला. न्यू गुजरात फायरवर्क्स या युनिटमध्ये स्फोटानंतर मोठी आग लागली. या दुर्घटनेत नऊ जणांचा मृत्यू झाला, तर सहा ते सात जण घायाळ झाले. २०२६ मधील सर्वांत भीषण फटाका दुर्घटनांपैकी एक दुर्घटना १९ एप्रिलला तामिळनाडूतील विरुधुनगर जिल्ह्यातील कट्टनारपट्टी येथे घडली. फटाके बनवणाऱ्या कारखान्यात रासायनिक पदार्थांच्या मिश्रणादरम्यान घर्षणामुळे हा स्फोट झाला.

या स्फोटात २३ कामगारांचा मृत्यू झाला, तर आठ जण घायाळ झाले. त्यापैकी काहींची प्रकृती गंभीर होती. बचावकार्यादरम्यान एक अग्निशमन कर्मचारीही घायाळ झाला. गेल्यावर्षीही शिवकाशी आणि अन्य ठिकाणच्या फटाके कारखान्यांत आगी लागून मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्त हानी झाली होती. फटाक्यांच्या कारखान्यांतील गंधक (सल्फर), पोटॅशियम नायट्रेट आणि ॲल्युमिनियम पावडरचे सूक्ष्म कण श्वासावाटे सतत फुप्फुसांत जातात. यामुळे कामगारांना दमा, क्रॉनिक ब्रॉंकायटिस, न्यूमोनिया आणि फुप्फुसांना इजा (लंग स्कारिंग) होण्याचा धोका असतो. रासायनिक भुकटीचा थेट संपर्क त्वचेशी आल्याने त्वचेची जळजळ, पुरळ, ॲलर्जी आणि रासायनिक भाजण्याच्या समस्या उद्भवतात. तसेच रसायनांचे कण किंवा ठिणग्या डोळ्यात गेल्याने दृष्टी कमी होणे किंवा कायमचे अंधत्व येण्याचा धोका असतो, कारखान्यात वापरले जाणारे शिसे , मँगनीज, बेरियम आणि क्रोमियम यांसारखे जड धातू शरीरात साचत जातात. यामुळे मज्जासंस्थेचे आजार, हृदयविकार, थायरॉईडच्या समस्या आणि पोटाचे विकार उद्भवू शकतात. एकूणच पाहता फटाक्यांचे कारखाने कामगारांना रोजगार पुरवणारी साधने आहेत कि त्यांच्या मृत्यूचे सापळे आहेत हा प्रश्न कुणालाही पडावा. फटाक्यांच्या आवाजामुळे आणि रोषणाईमुळे क्षणिक सुख मिळत असले तरी त्यामुळे होणारी हानी आणि त्याचे दूरगामी परिणाम पाहता भारतात फटाक्यांवर बंदी आणणे आवश्यक झाले आहे.

- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क : ९६६४५५९७८०

प्रदुषणाची 'दिवाळी'



दिवाळी सण जगभर तसेच देशात मोठ्या ऊत्साहाने साजरा झाला, मात्र दिवाळी सण साजरा होत असताना न्यायालयाने' आदेश 'दिले-कुणीच नाही पाळले असेच चित्र सर्वत्र दिसले. गेल्या काही दिवसांपासून देशाची राजधानी दिल्ली आणि राज्याची राजधानी मुंबई तसेच राज्यात आणि देशात हवेची खालावलेली गुणवत्ता हा सर्वांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. दिल्ली मधे तर वर्षी हिवाळ्यात पंजाब, हरियाणा या राज्यांत पराली जाळली जाते आणि त्यामुळे दिल्लि ची हवा प्रदुषित होते आणि त्याचा त्रास नागरिकांना होतो,श्वसनाचे त्रास, दमा या सारखे आजार वाढतात यावर्षी देखील हेच होणार. या वर्षी राज्यात मुंबई सह नागपूर, पुणे, ठाणे, या सारख्या अनेक शहरात हवेचा दर्जा चिंताजनक स्तरावर घसरला आहे. दिल्लि मुंबई सारखी राजधानीची शहरे ही प्रदुषणाची राजधानी बनले. जगातील शंभर प्रदुषित शहरांपैकी ९३ शहरे भारतातील आहेत आणि हवेच्या गुणवत्ता निर्देशांकात मर्यादेच्या पलिकडे वाढ झाली. त्यातच देशात आणि राज्यात अनेक ठिकाणी फटाक्यांमुळे आगडोंब ऊसळला.पटाख्यांमुळे कल्याण डोंबिवलीत एकाच दिवशी ७० ठिकाणी आगी लागून मालमत्तेचे नुकसान झाले आहे. भांडुप मधे एका मॉलला आग लागली तर मालवणीत आगीमुळे एकाचा मृत्य झाला.पंढरपुर येथे बांबु डेपोला आग लागली. फटाख्यांमुळे धाराशिव येथे लागलेल्या आगीमुळे एकाच घरातील सहा माणसे आगीच्या धुरात गुदमरून व आगीत जळून मृत्युमुखी पडले.राजस्थान मधील श्रीगंगानगर ऐक्युआय ८६८ वर पोहचला तर नाशिक सारख्या शहरात ऐक्युआय ९६४ वर पोहचला होता. पुणे पिंपरी चिंचवड अती वाईट श्रेणीत आहेत तर तिकडे नागपुरची हवा देखील बिघडली. फटाख्यांमुळे हवेतील प्रदुषणाची पातळी देखील जीवघेणी झाली आहे. बिघडलेले निसर्गाचे संतुलन आणि पर्यावरणाची आपणच केलेली हानी याचे दुष्परिणाम आता मोठ्याप्रमाणावर दिसु लागले आहेत, आणि हेच नेमके दिवाळी सणात जनतेने अनुभवले.

देशात आणि राज्यात पर्यावरण रक्षणासाठी वेगळे खाते कार्यरत आहेत, महाराष्ट्र प्रदूषण कंट्रोल बोर्ड आहे. ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी राज्यात 'ध्वनीप्रदूषण नियमन व नियंत्रण कायदा २०००' देखील मंजुर करण्यात आला आहे. वेळोवेळी जनजागृती केली जाते, कायद्याचा बडगा उगारला जातो तरी देखील जिकडेतिकडे पर्यावरणाची समस्या गंभीर होत चालली आहे. जनजागृती बाबत बीएम सी ने तर 'दिया दिवाळी साजरी केली. ऊच्च न्यायालयाने आदेश देऊन देखील बीएमसी ने शेवट पर्यंत दिया मिर्झा हिचा व्हिडिओ अपलोड केला नाही. ध्वनीप्रदूषण, हवेतील प्रदुषण, या समस्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयाने धार्मिक कार्यक्रम, वैयक्तीक लग्न समारंभ, सार्वजनिक कार्यक्रम करतांना आवाजाची मर्यादा घालून दिली आहे, त्याच बरोबर घातक फटाके फोडण्यास, वापरावर निर्बंध घातले आहे.यावर्षी हवेचा चिंताजनक घसरलेला स्तर लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई व मुंबई विकास प्राधिकरण या श्रेत्रात वेळचे बंधन घालुन दिले होते मात्र त्याचे पालन तर कुणीच केले नाही शिवाय सर्रास ऊल्लंघन केले गेले. शहापुरात देखील न्यायालयाचे आदेश कागदावरच राहिले,रात्रभर फटाके फुटतच राहिले. केवळ दिवाळीच नव्हे तर इतर धार्मिक सण-उत्सव साजरे होत असतांना कसलेच भान राखले जात नाही कि धार्मिक कार्यक्रमाचे पावित्र्य राखले जात नाही. असे सणवार म्हणजे केवळ धांगडधिंगा करण्याचा परवाना नव्हे याचे भान सगळ्यांनीच बाळगण्याची गरज आहे.

नियम आपल्यासाठीच बनवले जातात, त्याचे पालन आपणच करायचे असते, तेच आपल्या हिताचे असते याचे भान सगळ्यांनीच बाळगण्याची गरज आहे. पण केवळ जनतेलाच दोष देण्यात काय अर्थ? ज्या राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते, राज्यकर्ते शासन-प्रशासन यांनी यंत्रणा राबवायच्या, जनतेसमोर आदर्श घालून द्यायचे, कायदे नियम पाळायचे तेच अनेकदा नियम पाळत नाही कि न्यायालयाचे आदेश मानत नाही मग जनता देखील तेच अनुकरण करते. आजकाल तर जवळ जवळ सर्वच धार्मिक कार्यक्रम, ऊत्सवांमधे राजकीय घुसखोरी झाली आहे, पक्षाचे झेंडे लावुन उत्सव साजरे केले जातात मग त्यामधे स्पर्धा, चुरस निर्माण होऊन भव्यदिव्य करण्याची चढाओढ लागते, ते देखील करोडो रुपये खर्च करून. अतिउत्साहात नेमके तेच होत नाही. ऐकिकडे जगाचा पोशिंदा बळीराजा अडचणीत आहे, राज्यावर दुष्काळाचे सावट आहे, पाण्याचे गंभीर संकट उभे ठाकले आहे, येणारा काळ अमृतकाल नसेल तर संकटकाल असेल अशा सगळ्या पार्श्वभूमीवर दिवाळी साजरी केली गेली मात्र परिस्थितीचे भान राखले गेले नाही. सणांचा आनंद लुटायला हवा पण काळ वेळ, परिस्थितीचे भान राखुन.

- अनंत बोरसे
शहापूर जिल्हा ठाणे
मो.९१५८४९५०३७

श्वास

वृक्षारोपण समारोह
इव्हेंट करु या खास
शब्दबोले परवलीचे
नसे पर्यावरण -हास

रोपेलावा माळराना
सुशोभित रे आरास
बडी मंडळी बोलावे
कार्यक्रम हो फर्मास

पार्टी झोडू आनंदात
वन भोजन झकास
बडी नेते मंडळी इथे
भेटाया येई हमखास

फोटोग्राफर बोलवले
प्रसिद्धी मिळे फर्मास
धूम धमाल मिडियांत
वलयात विनासायास

वनराई बहरली इकडे
कागदोपत्रांत विकास
नोंदणी लाखो वृक्षांची
प्रत्यक्षांत विजन वास

रे निसर्ग प्रदत्त देणगी
वनप्राणीपक्षी निवास
जंगल तोड अव्याहत
मानवे थाटले आवास

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

देशद्रोह्यांना शोधण्यासाठी टास्कफोर्स उभारावा !

नाशिक जिल्ह्यातील सुप्रसिद्ध त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर आणि सप्तशृंगी गड या २ प्रमुख देवस्थानांना बाँबने उडवण्याची धमकी ई-मेलद्वारे देण्यात आल्याने सुरक्षायंत्रणा सतर्क झाल्या आहेत. दिवाळीच्या सुटीनिमित्त मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी होते.

त्यामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून दोन्ही देवस्थानांच्या परिसरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पुढील वर्षीपासून नाशिक नगरीत सुरु होणाऱ्या सिहंस्थ कुंभमेळ्याच्या धर्तीवर दोन्ही देवस्थानाना आलेली धमकी सुरक्षा यंत्रणांच्या दृष्टीने अधिक सजग राहण्यासाठी इशारा ठरली आहे. हिंदूंच्या सण-उत्सवांच्या काळात देवस्थानाना, धार्मिक स्थळांना धमक्या येण्याचे प्रकरण तसे नवीन नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे भारतात अन्य पंथीयांच्या धार्मिक स्थळांना कधी धमक्यांचे ईमेल अथवा फोन येत नाहीत. प्रत्येक वेळेस हिंदूंची धार्मिक स्थळे आतंकवाद्यांच्या हिटलिस्टवर असतात.

हिंदूंच्या सण उत्सवांसह स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिन यांसारखे राष्ट्रीय उत्सवही दरवर्षी आतंकवादाच्या सावटाखाली साजरे केले जातात. त्यामुळे भारतात राहून, येथील सुख सुविधा उपभोगुन शत्रूराष्ट्रासाठी काम करणाऱ्या नमकहरामांना शोधून काढण्याची मोहीम अंतर्गत सुरक्षा व्यवस्थांनी वर्षभर राबवायला हवी. कोणतिही आतंकवादी कारवाई जशी स्थानिकांच्या साहाय्याशिवाय पूर्णत्वाला नेता येत नाही तसे अशा प्रकारचे धमकीचे ईमेल आणि फोनही देशातील देशद्रोह्यांची मदतीशिवाय करण्याचे धाडस कोणी करू शकत नाही त्यामुळे केंद्र सरकारने या देशद्रोह्यांची पाळेमुळे खणून काढण्यासाठी स्पेशल टास्क फोर्स उभारावा !

– सौ. मोक्षदा घाणेकर,
काळाचौकी, मुंबई

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

दातिवली तलावाचे विद्रुपीकरण हटवण्यास महापालिकेकडून सुरुवात

मनसेच्या मागणीला यश, मात्र थातुरमातुर कारवाई खपवून घेणार नाही



अक्षराज : विनोद वास्कर

दि.१२, दिवा (ठाणे) : शहरातील दातिवली तलाव परिसरात छठपूजेच्या निमित्ताने सिमेंट व मातीचे चौथरे तयार करून त्यावर आयलंड पट्ट्या लावून नावे व नंबर लिहिण्यात आले होते. यामुळे तलावाच्या नैसर्गिक सौंदर्याला बाधा पोहोचत असून तलाव परिसराचे विद्रुपीकरण होत असल्याचा मुद्दा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उपस्थित केला होता. यासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेना दिवा शहराच्या वतीने उपशहर अध्यक्ष किरण दळवी यांच्या नेतृत्वाखाली विभाग अध्यक्ष शैलेंद्र कदम यांनी दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांना लेखी निवेदन देऊन तलाव परिसरातील अनधिकृत चौथरे हटवावेत, रंगकाम व इतर विद्रुपीकरण तात्काळ थांबवावे तसेच छठपूजेसाठी स्वतंत्र जागा व योग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली होती.

याच अनुषंगाने आज मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी वॉर्ड ऑफिसर यांची भेट घेऊन या विषयाचा पाठपुरावा केला. मनसेच्या तक्रारीची दखल घेत महापालिका प्रशासनाने तलाव परिसरातील विद्रुपीकरण हटवण्यास सुरुवात केली आहे.

मात्र, ही कारवाई केवळ वरवरची किंवा थातुरमातुर ठरू नये. तलाव परिसरातील सर्व अनधिकृत बांधकामे व विद्रुपीकरण पूर्णपणे हटवून तलावाचे नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवावे. तसेच भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी महापालिकेने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अधिक आक्रमक भूमिका घ्यावी लागेल, असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला.

तलाव हे शहराचे नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे जलस्रोत आहेत. धार्मिक उत्सवांना आमचा विरोध नाही; मात्र धार्मिक विधींच्या नावाखाली सार्वजनिक नैसर्गिक संपत्तीचे नुकसान होता कामा नये, हीच मनसेची भूमिका आहे. यावेळी महिला उपशहर अध्यक्ष नम्रता खराडे, विभाग सचिव सुशांत तांडेल, उपविभाग अध्यक्ष धनेश पाटील, शाखाध्यक्ष विराज पाटील, रमेश शिंदे, विशाल दुडाम आणि इतर मनसे पदाधिकारी व सहकारी उपस्थित होते.

ठाणे जिल्ह्यात ११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान 'जनजातीय गौरव सप्ताहा'चे आयोजन

आदिवासी बांधवांना मिळणार शासनाच्या विविध योजनांचा लाभ

अक्षराज : जे.के.पोळ

दि.१२, ठाणे : धरती आबा क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांच्या वतीने ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत संपूर्ण प्रकल्प कार्यक्षेत्रात 'जनजातीय गौरव सप्ताह' उत्साहात साजरा केला जाणार आहे. या सप्ताहात विविध लोकोपयोगी उपक्रम, आरोग्य शिबिरे आणि शासकीय योजनांच्या लाभाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, सहायक प्रकल्प अधिकारी व नोडल अधिकारी अरविंद जाधव आणि आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त अशोक इरनक यांनी दिली आहे.या गौरव सप्ताहानिमित्त १२ नोव्हेंबर रोजी भिवंडी तालुक्यातील रावत्याचा पाडा येथे जात दाखले आणि आधार कार्ड शिबिर घेतले जाईल. १३ नोव्हेंबर रोजी भिवंडी तालुक्यातील चिंबीपाडा येथे न्यूक्लियस बजेट योजना व महिला बचत गटांना धनादेश वाटप, घरकुल, आयुष्यमान कार्ड, आरोग्य शिबिर, नवीन अर्ज स्वीकारणे आणि स्वयंरोजगार व कृषीपूरक व्यवसायाबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. १४ नोव्हेंबर रोजी शहापूर तालुक्यातील उंभ्रई किन्हवली येथे सर्व आदिवासी स्मारके व पुतळ्यांची स्वच्छता करून सायंकाळी दीपोत्सव आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) आमदार दौलत दरोडा आणि अशोक इरनक उपस्थित राहणार आहेत.मुख्य जयंतीदिनी १५ नोव्हेंबर रोजी मुरबाड तालुक्यातील मोरोशी आणि शहापूर प्रकल्प कार्यालयात आमदार किसन कथोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत भगवान बिरसा मुंडा व इतर आदिवासी महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन केले जाईल.

यावेळी गेल्या १२ वर्षांतील पद्म पुरस्कारप्राप्त व 'मन की बात'मध्ये उल्लेख झालेल्या आदिवासी विभूतींचा तसेच दहावी-बारावीच्या परीक्षेत प्रथम आलेल्या आश्रमशाळेतील तीन विद्यार्थ्यांचा सत्कार होणार असून रानभाजी व खाद्य महोत्सवाचेही आकर्षण असेल.पुढील टप्प्यात १६ नोव्हेंबर रोजी शहापूर तालुक्यातील चिंध्याचीवाडी आणि अंबरनाथ तालुक्यातील लव्हाळी येथे आधार कार्ड, रेशन कार्ड, सुकन्या समृद्धी योजना, वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दाव्यांबाबत मार्गदर्शन आणि आरोग्य तपासणी शिबिर होईल. १७ नोव्हेंबर रोजी शहापूर तालुक्यातील अघई येथे विविध दाखल्यांसह रक्तदाब, मधुमेह व सिकलसेल तपासणी शिबिर, माता-बाल संगोपन, पोषण आहार जनजागृती, वनपट्टेधारकांसाठी विशेष शिबिर आणि राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजनेबाबत मार्गदर्शन केले जाईल.या सप्ताहाचा समारोप १८ नोव्हेंबर रोजी मुरबाड तालुक्यातील खुटल येथे होणार आहे. समारोपाच्या दिवशी विविध दाखल्यांचे शिबिर, युवक-युवतींसाठी कौशल्य विकास, अप्रेंटिसशिप, स्वयंरोजगार, बँक खाती व शिष्यवृत्ती नोंदणी, तसेच महिला बचत गटांच्या सहभागातून राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजनेची माहिती दिली जाणार आहे.या सर्व उपक्रमांचा आदिवासी बांधवांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

पारनेर तालुक्यात चारा डेपो तात्काळ सुरू करा; अन्यथा तीव्र आंदोलन - मनसेचा तहसीलदारांना इशारा

अक्षराज : राजकुमार इकडे

दि.१२, सुपा (अहिल्यानगर) : पारनेर तालुक्यात जनावरांच्या चारा व पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असून शासनाने अनुदानित दरात चारा डेपो तात्काळ सुरू करावेत, या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मनसे तालुकाध्यक्ष अविनाश मुरलीधर पवार यांनी निवेदनात म्हटले आहे की, पावसाअभावी तालुक्यात हिरवा चारा संपला असून बाजारातील चाऱ्याचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्याला जनावरे जगवणे कठीण झाले आहे.

मनसेच्या प्रमुख मागण्या :- १) आम्हाला चारा छावण्या नकोत, तर शेतकऱ्याला परवडेल अशा अनुदानित दरात डेपोतून चारा उपलब्ध करून द्यावा.२) पाणी टंचाई असलेल्या गावात जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकरची सुविधा सुरू करावी.३) पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या कडून जनावरे संख्या सर्व्हे ची आकडेवारी घेऊन शेतकऱ्यांना चारा द्यावा.या मागण्यांवर ८ दिवसात ठोस कार्यवाही न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना पारनेर तालुक्याच्या वतीने मुक्या जनावरांच्या चारा-पाण्यासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी तालुका अध्यक्ष पवार यांनी दिला.याप्रसंगी मनसेचे पारनेर शहर अध्यक्ष सतीश म्हस्के, सुपा शहर अध्यक्ष अक्षय सुर्यवंशी, सुपा ग्रामपंचायत सदस्य विलास तात्या पवार तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

हृदयशस्त्रक्रियेनंतर चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य, आ.जोरगेवारांसोबत साजरी केली आनंदाची दिवाळी

जवळपास 300 चिमुकल्यांना मिळाले नवजीवन



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१२, चंद्रपूर : दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा आणि नव्या आशेचा सण. मात्र,ज्या घरांमध्ये चिमुकल्यांच्या हृदयविकारामुळे चिंतेचे सावट होते,त्या घरांमध्ये आज आनंदाचे दिवे उजळले आहेत. काही दिवसांपूर्वी आपल्या लहानग्यांच्या हृदयशस्त्रक्रियेच्या चिंतेने व्याकूळ असलेले पालक आज त्याच चिमुकल्यांना हसताना,खेळताना आणि आनंदाने दिवाळी साजरी करताना पाहत आहेत. या आनंदाला आणखी खास बनविण्यासाठी हृदयशस्त्रक्रिया यशस्वी झालेल्या चिमुकल्यांनी आपल्या पालकांसह आ. किशोर जोरगेवार यांच्या निवासस्थानी भेट देत त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद साजरा केला. यावेळी कल्याणी किशोर जोरगेवार या देखील उपस्थिती होत्या.

यावेळी चिमुकल्यांनी आणि त्यांच्या पालकांनी आ. किशोर जोरगेवार यांची भेट घेऊन त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. आ. जोरगेवार यांनी ही सर्वांचे प्रेमाने स्वागत करत चिमुकल्यांना दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. सर्वांसोबत दिवाळीचा फराळ करत त्यांनी आनंदाचे क्षण अनुभवले. चिमुकल्यांच्या निरागस हास्याने आणि पालकांच्या चेहऱ्यावरील समाधानाने निवासस्थानातील वातावरण भावूक आणि आनंदमय झाले होते.

विशेष म्हणजे, आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून आतापर्यंत जवळपास ३०० चिमुकल्यांच्या हृदयशस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. यात एक दिवसाच्या बाळापासून १७ वर्षाच्या मुलांचा समावेश आहे. हृदयविकारावरील या शस्त्रक्रिया अत्यंत खर्चिक असतात. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक पालकांना आपल्या मुलांवर योग्य उपचार करणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत या कुटुंबांना आधार देण्यासाठी आ. किशोर जोरगेवार यांच्या वतीने विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येते. या शिबिरांमध्ये तपासणी करून हृदयशस्त्रक्रियेसाठी पात्र ठरणाऱ्या बालकांच्या पुढील उपचारांची व्यवस्था केली जाते.

या बालकांवर मुंबई येथील खासगी रुग्णालयांमध्ये आवश्यक त्या हृदयशस्त्रक्रिया करण्यात येतात. विशेष म्हणजे,केवळ शस्त्रक्रियेची व्यवस्था करून ही जबाबदारी संपत नाही, तर चिमुकल्यांसह त्यांच्या पालकांच्या मुंबईपर्यंतच्या जाण्या-येण्याची तसेच उपचाराच्या काळातील राहण्याची व्यवस्थाही आ. किशोर जोरगेवार यांच्या वतीने केली जाते. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहण्याची वेळ आलेल्या अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. जवळपास ३०० चिमुकल्यांच्या हृदयावर यशस्वी उपचार होऊन त्यांना नव्याने निरोगी आयुष्य जगण्याची संधी मिळाली आहे.

काही दिवसांपूर्वी याच चिमुकल्यांच्या हृदयशस्त्रक्रियेचा प्रश्न त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठ्या चिंतेचा विषय होता. लहान वयातच हृदयविकाराचा सामना करणाऱ्या मुलांच्या उपचारांचा खर्च,शस्त्रक्रियेची गुंतागुंत आणि त्यांच्या भविष्याची काळजी यामुळे पालक हतबल झाले होते. मात्र,आज त्याच चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर फुललेले निरागस हास्य आणि त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यांवर दिसणारे समाधान पाहून या प्रयत्नांचे मोल अधोरेखित झाले.

एखाद्या कुटुंबाच्या आयुष्यातील दुःख दूर करून त्यांच्या जीवनात आनंदाचे रंग भरता येणे,यापेक्षा मोठे समाधान दुसरे कोणतेही नाही. या चिमुकल्यांना नव्याने आयुष्य जगण्याची संधी मिळाली आणि त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलले,हीच माझ्यासाठी सर्वात मोठी कमाई आहे. आज या चिमुकल्यांनी दिलेल्या दिवाळीच्या शुभेच्छा आणि त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हीच माझ्यासाठी अनमोल भेट आहे.


समाजकारण हे केवळ पद,प्रतिष्ठा किंवा राजकीय जबाबदारीपुरते मर्यादित नसून,गरजेच्या वेळी एखाद्याच्या आयुष्यात आशेचा किरण बनणे,हेच खऱ्या अर्थाने लोकसेवेचे सार आहे. दिवाळीच्या प्रकाशपर्वात या चिमुकल्यांच्या आयुष्यात आरोग्याचा,आनंदाचा आणि नव्या भविष्याचा प्रकाश उजळला. त्यांच्या हास्यातून आणि पालकांच्या समाधानातून या उपक्रमाचे खरे यश दिसून आले.

ताडोबा - व्याघ्र अंधारी प्रकल्पात दुर्मिळ पक्ष्याचे आगमन

लाल पंखाचा चातक प्रथमच चंद्रपूर जिल्ह्यात आढळला

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१२, चंद्रपूर : वाघांच्या अस्तित्वाने जगभरात ओळखल्या जाणाऱ्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या जंगलात आणखी एका दुर्मिळ पाहुण्याचे आगमन झाले आहे. लाल पंखाचा चातक या अत्यंत देखण्या आणि दुर्मिळ स्थलांतरित पक्ष्याची ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पासह संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात प्रथमच अधिकृत नोंद झाली आहे. निसर्गाच्या कुशीत दडलेल्या जैवविविधतेचा अनमोल ठेवा पुन्हा एकदा समोर आल्याने पक्षीप्रेमी आणि वन्यजीव अभ्यासकांमध्ये आनंद व्यक्त होत आहे. ७ नोव्हेंबर २०२६ रोजी कोळसा वनपरिक्षेत्रात या दुर्मिळ पक्ष्याचे दर्शन घडले. कारवा वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद जांभुळे यांनी या पक्ष्याचे निरीक्षण करून छायाचित्रासह त्याची नोंद केली. विशेष म्हणजे, ही नोंद ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि चंद्रपूर जिल्ह्यासाठी पहिली अधिकृत व छायाचित्राद्वारे पुष्टी झालेली नोंद ठरली आहे.



लाल पंखाचा चातक हा कोकिळ कुळातील मध्यम आकाराचा आकर्षक पक्षी आहे. डोक्यावर चमकदार काळ्या रंगाचा तुरा, मानेभोवती पांढरा पट्टा आणि तांबूस-तपकिरी रंगाचे आकर्षक पंख ही त्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. हा स्थलांतरित पक्षी असून त्याचा प्रजनन काळ प्रामुख्याने हिमालयाच्या पायथ्याशी आणि ईशान्य भारतातील काही भागांत असतो. स्थलांतराच्या काळात तो द्वीपकल्पीय भारतात ही आढळतो. महाराष्ट्रात या पक्ष्याचे दर्शन अत्यंत दुर्मिळ मानले जाते. पक्ष्यांच्या निरीक्षणांची जागतिक स्तरावर नोंद ठेवणाऱ्या ईबर्ड या संकेतस्थळानुसार, महाराष्ट्रातून या पक्ष्याच्या केवळ सात नोंदी उपलब्ध आहेत. त्यामुळे ताडोबातील ही नोंद राज्याच्या पक्षीवैविध्याच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची ठरली आहे. वन्यजीव अभ्यासक तथा कोठारी वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्राधिकारी रुंदन कातकर यांनी सांगितले की, मागील वर्षीही याच परिसरात या पक्ष्याचे दर्शन झाले होते. मात्र, त्यावेळी छायाचित्र घेता न आल्याने अधिकृत नोंद करता आली नव्हती. यंदा छायाचित्रासह झालेल्या नोंदीमुळे या दुर्मिळ पक्ष्याच्या अस्तित्वाला अधिकृत पुष्टी मिळाली आहे. नव्या नोंदीमुळे ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील नोंदणीकृत पक्षी प्रजातींची संख्या आता ३०४ झाली आहे. वाघांच्या डरकाळ्यांनी दुमदुमणाऱ्या ताडोबाच्या जंगलात दुर्मिळ पक्ष्यांचाही मुक्त संचार असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. जंगलाचा अधिवास सुरक्षित आणि समृद्ध असेल तर केवळ मोठे वन्यजीवच नव्हे, तर अशा दुर्मिळ पक्ष्यांनाही येथे आश्रय मिळतो, याची ही जिवंत साक्ष आहे.

चंद्रपूरच्या क्रीडा वैभवाला मिळणार नवी झेप

वीर बाबुराव शेडमाके क्रीडा संकुलाच्या १३७ कोटींच्या प्रस्तावाला गती

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१२, चंद्रपूर : क्रीडा हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून युवकांच्या सामर्थ्याला दिशा देणारे, शिस्त आणि जिद्दीची रुजवण करणारे तसेच जिल्ह्याची ओळख राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावणारे प्रभावी माध्यम आहे, या ठाम भूमिकेतून आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूरच्या क्रीडा विकासासाठी सातत्याने पुढाकार घेतला आहे.

याच क्रीडाध्यासातून मौजा दाताळा येथे १३७ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक वीर बाबुराव शेडमाके क्रीडा संकुलाच्या प्रस्तावाला गती मिळावी, यासाठी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथील वर्षा शासकीय निवासस्थानी भेट घेऊन निवेदन सादर केले. या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री महोदयांनी विशेष बैठक आयोजित करण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले असून, लवकरच यासंदर्भात बैठक होणार आहे.

नवीन चंद्रपूर विकास योजनेअंतर्गत मौजा दाताळा येथे वीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने साकारण्यात येणाऱ्या भव्य क्रीडा संकुलासाठी १६ एकर जागा आरक्षित करण्यात आली आहे. चंद्रपूरच्या क्रीडा क्षेत्राला नवी उंची देणारा हा महत्त्वपूर्ण निर्णय असून, स्थानिक खेळाडूंच्या कौशल्याला हक्काचे व्यासपीठ आणि भावी पिढीच्या क्रीडा स्वप्नांना भक्कम आधार देणारा ठरणार आहे.

आ.सुधीर मुनगंटीवार यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान केवळ संकल्पना आणि घोषणांपुरते मर्यादित नसून, जिल्ह्यात उभारलेली क्रीडा संकुले, स्टेडियम आणि विविध क्रीडा सुविधांमधून त्यांच्या क्रीडाप्रेमाची आणि विकासदृष्टीची साक्ष मिळते. खेळाडूंना दर्जेदार सराव सुविधा, स्पर्धांसाठी सक्षम व्यासपीठ आणि आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटविण्याची संधी मिळावी, यासाठी त्यांनी सातत्याने क्रीडा पायाभूत सुविधांच्या निर्मितीला प्राधान्य दिले आहे.



याच क्रीडादृष्टीचा आणखी एक प्रेरणादायी आविष्कार म्हणजे 'मिशन शौर्य' या मोहिमेच्या माध्यमातून १७ ते १८ वयोगटातील आदिवासी युवकांमधील असामान्य जिद्द, साहस आणि सुप्त सामर्थ्याला जागतिक व्यासपीठ मिळाले. या मोहिमेतील पाच आदिवासी युवकांनी जगातील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखर सर करून इतिहास घडविला.

त्यांच्या या अतुलनीय काम गिरीचा गौरव देशाचे पंतप्रधान युगपुरुष नरेंद्रजी मोदी यांनी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून केलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात विशेष उल्लेखाने केला. क्रीडा सुविधा उभारून खेळाडू घडविणे आणि दुर्गम भागातील आदिवासी युवकांच्या स्वप्नांना थेट एव्हरेस्टच्या शिखरापर्यंत झेप घेण्याचे बळ देणे, या दोन्ही आघाड्यांवरील आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे कार्य त्यांच्या दूरदृष्टीची, क्रीडाप्रेमाची आणि युवा सामर्थ्यावरील अढळ विश्वासाची प्रचिती देणारे आहे.

वीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने साकारण्यात येणारे हे क्रीडा संकुल केवळ अत्याधुनिक क्रीडा सुविधांचे केंद्र न राहता, गोंडवाना भूमीचा गौरवशाली इतिहास, आदिवासी युवकांचे सामर्थ्य आणि भावी पिढीच्या स्वप्नांना नवी भरारी देणारे प्रेरणास्थान बनेल.

चंद्रपूरसह संपूर्ण पूर्व विदर्भाच्या क्रीडा क्षेत्राला नवी ओळख मिळवून देणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणजे खेळाडूंच्या गुणवत्तेला बळ देणारे आणि नव्या पिढीच्या क्रीडास्वप्नांना आकार देणारे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

तेलंगणा राज्यातील रिम्स रुग्णालयातील २० लाखांचा व्हेंटिलेटर चोरी प्रकरणात एका आरोपीस अटक

तेलंगणा पोलिसांच्या स्वाधीन; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१२, चंद्रपूर : तेलंगणा राज्यातील आदिलाबाद येथील राजीव गांधी वैद्यकीय विज्ञान संस्था (रिम्स) रुग्णालयातून चोरीस गेलेल्या चार महागड्या व्हेंटिलेटर प्रकरणात चंद्रपूर पोलिसांना मोठे यश आले आहे. या गुन्ह्यातील मुख्य संशयित आरोपीला चंद्रपूर शहरातून ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाईसाठी तेलंगणा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

यासंदर्भात सूत्रांच्या माहितीनुसार दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी आदिलाबाद येथील 'रम्स' शासकीय रुग्णालयातील आरआयसीयू तसेच एसएआरआय व टीबी वॉर्डमधून प्रत्येकी ५ लाख किम तीचे ४ व्हेंटिलेटर (एकूण अंदाजे किंमत ₹२० लाख) अज्ञात इसमाने चोरून नेले होते. या गंभीर घटनेबाबत आदिलाबाद-११ टाऊन पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ७५१/२०२६, भारतीय न्याय संहिता



(बीएनएस) चे कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्राप्त सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. तसेच गोपनीय सूत्रांकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे संशयित व्यक्ती चंद्रपूर येथील अंचलेश्वर गेट परिसरात वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाले. मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी तात्काळ सापळा रचून सज्जन वसंत मोटे (वय ४५ वर्षे, रा. अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर) याला ताब्यात कसून विचारपूस केली असता, त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर आरोपीस आवश्यक कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून पुढील तपास व जप्ती प्रक्रियेसाठी तेलंगणा पोलिसांच्या पथकाकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

सदर कामगिरी. आयुष नोपानी पोलीस अधीक्षक, चंद्रपूर, ईश्वर कातकडे अपर पोलीस अधीक्षक, चंद्रपूर याचे मार्गदर्शनात अमोल काचोरे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांचे नेतृत्वात सपोनि योगेश हिवसे, पोउपनि विनोद भुरले, पोउपनि सुनिल गौरकार, पोहवा सतीश अवथरे, इमरान खान, संदीप कामडी, हिरालाल गुप्ता, लालु यादव, पोअं शशांक बादामवार, किशोर वाकाटे सर्व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी केली आहे.

'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' मध्ये नवी मुंबई देशातील प्रथम क्रमांकाच्या सर्वोत्कृष्ट स्वच्छ शहर पुरस्काराची मानकरी

महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते महापौर सुजाता पाटील यांनी स्विकारला सन्मान

स्वच्छतामित्र, स्वच्छतासखी आणि सर्व नागरिकांना हा देशात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार समर्पित



अक्षराज : जे.के.पोळ

दि.११, नवी मुंबई : शहरी गृहनिम र्ण व विकास मंत्रालयांच्या वतीने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत आयोजित 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' मध्ये यावर्षी नवी मुंबई शहर देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहरांमध्ये प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले आहे.

नवी दिल्ली येथे विज्ञान भवनात संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण समारंभप्रसंगी देशाच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी, उपमहापौर दशरथ भगत, आयुक्त डॉ.कैलास शिंदे, शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या उपस्थितीत हा सर्वोच्च मानाचा पुरस्कार स्विकारला.

याप्रसंगी केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर, राज्यमंत्री तोखन साहू व सचिव सत्येंद्र सिंग उपस्थित होते. या पुरस्कार वितरण समारंभाप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे उपस्थित होते.

देशातील स्वच्छ शहरांच्या क्रमवारीत सातत्याने अग्रभागी राहणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेने मागील ३-४ वर्षांपासून 'निश्चय केला, नंबर पहिला' हे आपले ध्येयवाक्य नजरेसमोर ठेवून त्याकडे नियोजनबद्ध पावले टाकत वाटचाल सुरू ठेवली होती. स्वच्छतेमधील आपले म ानांकन दरवर्षी उंचावत अखेरीस यावर्षी देशातील ४७५१ शहरांमधून नवी मुंबई म हानगरपालिकेचे सेवाभावी स्वच्छताकर्मी व नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नांतून समस्त लोकप्रतिनिधी आणि अधिकारी, कर्मचारी यांच्या माध्यमातून देशात प्रथम क्रमांकाच्या सर्वोत्तम स्वच्छ शहराचे लक्ष्य महानगरपालिकेने साध्य केले.

नवी मुंबईतील शहरातील प्रत्येक नागरिकासाठी हा अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण असून आपल्या सर्वांची प्रथम प्रतिनिधी म्हणून हा पुरस्कार महामहीम राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते स्वीकारण्याचा बहुमान मला लाभला हे माझे भाग्य असून हा पुरस्कार मी समस्त नवी मुंबईकर नागरिकांना आणि यासाठी सर्वाधिक काम करणाऱ्या स्वच्छतामित्रांना आणि स्वच्छतासखींना अर्पण करीत असल्याचे मत यावेळी म हापौर सुजाता पाटील यांनी व्यक्त केले.

उपमहापौर दशरथ भगत यांनीही या पुरस्कारामध्ये शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या स्वच्छताकर्मीच्या योगदानाचे सर्वाधिक महत्व असल्याचे सांगितले. यापुढील काळात सुगंधी शहर अभियानाच्या माध्यमातून आणखी चांगले काम होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनीही सर्व नागरिकांच्या आणि स्वच्छताकर्मींच्या कार्याचे हे यश असल्याचे सांगत नवी मुंबई महानगरपालिकेने अत्याधुनिक तंत्रज्ञानाची स्वच्छताकार्याला दिलेली जोड आणि त्यामध्ये नागरिकांचा लाभलेला सक्रिय सहभाग याचा सखोल विचार राष्ट्रीय पातळीवर झाला आणि नवी मुंबई देशात प्रथम क्रमांकाच्या शहराची मानकरी ठरली असे सांगितले.

हा सन्मान स्वच्छ भारत मिशन – शहरी अंतर्गत नवी मुंबईच्या सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीचे प्रतीक आहे. नवी मुंबईने देशातील सर्वात स्वच्छ शहरांमध्ये सातत्याने स्थान मिळवले असून, सुपर स्वच्छ लीग मध्ये समाविष्ट होण्याचा बहुमान तसेच सप्ततारांकित कचरामुक्त शहर (जीएफसी) आणि वॉटर प्लस प्रम ाणपत्र ही ओळख कायम राखली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या या यशामध्ये दैनंदिन स्वच्छतेची गुणवत्ता उंचावत ठेवणे, कचरा संकलन आणि कचरा वाहतुक या दोन्ही क्षेत्रात इंटिग्रेटेड कमांड कंट्रील सेंटर अशा अत्याधुनिक तंत्रप्रणालीचा वापर करणे, वर्गीकृत कचऱ्यावर त्याच्या श्रेणीनुसार सुयोग्य प्रक्रिया करणे त्यासोबत वस्त्र कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करणारे देशातील पहिले केंद्र यशस्वीरित्या चालविणे अशा विविध बाबींचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे पाण्याच्या पुनर्वापरावर भर देणे, नागरिकांना तक्रार करण्यासाठी व तक्रारींचे निराकरण करून त्याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचण्यासाठी माय एनएमएमसी ॲप, सिटीजन ग्रिव्हेन्स पोर्टल अशा विविध डिजीटल प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर करणे आदी बाबींचा प्राधान्याने विचार करण्यात आला. याशिवाय प्लास्टिक प्रतिबंधात्मक उपाययोजना, नागरिकांच्या सहभागातून व्यापक प्रमाणात स्वच्छता मोहीमांचे आयोजन व त्यामध्ये विद्यार्थी व युवकांच्या सहभागावर भर अशा वेगवेगळ्या गोष्टी प्राधान्याने करण्यात आलेल्या आहेत.

दातिवली तलावाचे विद्रुपीकरण हटवण्यास महापालिकेकडून सुरुवात

मनसेच्या मागणीला यश, मात्र थातुरमातुर कारवाई खपवून घेणार नाही

अक्षराज : विनोद वास्कर

दि.१२, दिवा (ठाणे) : शहरातील दातिवली तलाव परिसरात छठपूजेच्या निमित्ताने सिमेंट व मातीचे चौथरे तयार करून त्यावर आयलंड पट्ट्या लावून नावे व नंबर लिहिण्यात आले होते. यामुळे तलावाच्या नैसर्गिक सौंदर्याला बाधा पोहोचत असून तलाव परिसराचे विद्रुपीकरण होत असल्याचा मुद्दा म हाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उपस्थित केला होता.

यासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेना दिवा शहराच्या वतीने उपशहर अध्यक्ष किरण दळवी यांच्या नेतृत्वाखाली विभाग अध्यक्ष शैलेंद्र कदम यांनी दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांना लेखी निवेदन देऊन तलाव परिसरातील अनधिकृत चौथरे हटवावेत, रंगकाम व इतर विद्रुपीकरण तात्काळ थांबवावे तसेच छठपूजेसाठी स्वतंत्र जागा व योग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली होती.

याच अनुषंगाने आज मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी वॉर्ड ऑफिसर यांची भेट घेऊन या विषयाचा पाठपुरावा केला. मनसेच्या तक्रारीची दखल घेत महापालिका प्रशासनाने तलाव परिसरातील विद्रुपीकरण हटवण्यास सुरुवात केली आहे.

मात्र, ही कारवाई केवळ वरवरची किंवा थातुरमातुर ठरू नये. तलाव परिसरातील सर्व अनधिकृत बांधकामे व विद्रुपीकरण पूर्णपणे हटवून तलावाचे नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवावे. तसेच भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी महापालिकेने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अधिक आक्रमक भूमिका घ्यावी



लागेल, असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला.

तलाव हे शहराचे नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे जलस्रोत आहेत. धार्मिक उत्सवांना आमचा विरोध नाही; मात्र धार्मिक विधींच्या नावाखाली सार्वजनिक नैसर्गिक संपत्तीचे नुकसान होता कामा नये, हीच मनसेची भूमिका आहे.

यावेळी महिला उपशहर अध्यक्ष नम्रता खराडे, विभाग सचिव सुशांत तांडेल, उपविभाग अध्यक्ष धनेश पाटील, शाखाध्यक्ष विराज पाटील, रमेश शिंदे, विशाल दुडाम आणि इतर मनसे पदाधिकारी व सहकारी उपस्थित होते.

थोडक्यात बातम्या

विखे गटाचे निर्विवाद वर्चस्व! जिल्हा बँकेच्या चेअरमन पदी डॉ.सुजय विखे बिनविरोध; उपाध्यक्षपदी रणजितसिंह देशमुख



अक्षराज : राजकुमार इकडे

दि.१२, सुपा (अहिल्यानगर) : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या राजकारणात माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांची चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याने विखे गटाने बँकेवरील आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. तर उपाध्यक्षपदी रणजितसिंह देशमुख यांची निवड झाल्याने बँकेच्या सत्तेवर नव्या नेतृत्वाची मोहोर उमटली आहे.

जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या या निवडीत डॉ. सुजय विखे यांची बिनविरोध निवड होणे ही केवळ पदाची निवड नसून जिल्ह्यातील बदलत्या राजकीय समीकरणांचे संकेत मानले जात आहेत. जिल्हा बँकेच्या माध्यमातून सहकार क्षेत्रावर पकड मजबूत करण्याच्या दृष्टीने विखे गटाने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.

विशेष म्हणजे, जिल्हा बँकेच्या निवडणुकीत पारनेरमध्ये खासदार नीलेश लंके यांनी मिळवलेल्या विजयाने राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. मात्र चेअरमन पदाच्या निवडीत डॉ.सुजय विखे यांची बिनविरोध निवड झाल्याने जिल्ह्याच्या राजकारणात पुन्हा एकदा विखे गटाने आपली ताकद दाखवून दिली आहे.

जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना दीदी यांच्या आदेशाने अनेक दिवसांची स्वतंत्र डीपी ची मागणी अखेर पूर्ण



अक्षरज : अलीम शेख

दि.१२, चारठाणा (परभणी) : चारठाणा फाटा येथे विस्तारित वाढती घराची संख्या व वेल्डिंग वर्कशॉप व इतर लायनीवर चालणारे व्यवसाय मुळे चारठाणा फाटा येथील जुने १०० केवी चे विद्युत रोवित्र डीपी वरील लोड वाढल्यामुळे सतत डिव जाने, रॉड जळणे, वारंवार फ्युज जात असल्यामुळे परविन कॉलनी बालाजी नगर व फाटा परिसरातील नागरिकांनी नानासाहेब दादा राऊत यांची भेट घेऊन घराची वाढती संख्या निदर्शनास आणून देऊन नवीन विद्युत रोहित्र डीपी ची मागणी केली. या मागणीची दखल घेत नानासाहेब दादा राऊत यांनी सहकार्यासह पालकमंत्री सौ.मेघना दीदी यांची भेट घेऊन विस्तारित घराची संख्या व वाढत्या लोड ची माहिती देऊन १०० केवी डीपी ची मागणी करत मंजूर करून घेतली. आज त्या विद्युत रोहित्र डीपी चे मोठ्या थाटात नानासाहेब दादा राऊत यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख, डॉ.राजेश पोखर्णा,सय्यद तालेबअली,उपसरपंच वाजेद कुरेशी, साबेर पठाण, एकबालोद्दीन काझी,भाऊराव भवरे,अनिसखा पठाण,शेख अलीम,विशाल निकाळजे, शिवशंकर तम शेटे,बाबासाहेब हेंद्रे,शेख आसेफ,बद्रोद्दीन काझी,शिवशंकर तमशेटे,दीपक भाग्यवंत, शेख रईस,चिंतामण दौंड,शेख सिद्दीक,सय्यद आजम,बाबासाहेब म्हेत्रे,आण्णा म ुळे,पाशा कझी,अन्वर पठाण, अमोल भवरे, शेख फेरोज,आसेफ इनामदार,इसराईल कुरेशी,ओमा चव्हाण, सय्यद मुनाफ,शहेबाज कुरेशी,शेरु देशमुख,अबरार पठाण, शेख समीर,सिराज इनामदार, रफिक पठाण,इरफान इनामदार,उस्मान कुरेशी,अनसर भाई, सय्यद अझरअली, मकसुद कुरेशी,जाबेर पठाण,संकेत रामपुरकर,करण पवार यांच्यासह परविन कॉलनी सिकंदर कॉलनी व बालाजी नगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाचे नेते पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांच्या आदेशाने व नानासाहेब दादा राऊत यांच्या विशेष पुढाकाराने व प्रयत्नातुन आणि पदाधिकारी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे काम यशस्वी झाले.या जनहिताच्या कार्याबद्दल परवीन कॉलनी, बालाजी नगर, सिकंदर कॉलनी व फाटा परिसरातील नागरिकांच्या वतीने नानासाहेब दादा राऊत यांच्यासह पदाधिकारी मान्यवरांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.जनहितासाठीची इच्छाशक्ती सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि नागरिकांची एकजूट म्हणजेच विकासाची खरी ताकद!

भगवान बाबा नगर व मोहम्मदिया नगरमध्ये अनेक वर्षांनंतर पाणी सुरू; सरपंच करुणा कांबळे यांचा सत्कार



अक्षराज : अदित्य चिकटे

दि.१२, किनगाव (अहमदपूर) : भगवान बाबा नगर व मोहम्मदिया नगर येथे खूप वर्षांपासून पिण्याच्या पाण्याची समस्या होती. पाईपलाईन बंद असल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता. अखेर पाईपलाईनची दुरुस्ती करून भगवान बाबा नगरमध्ये पाणी सुरू करण्यात आले.

पाणी सुरू झाल्याबद्दल तेथील जनतेने समाधान व्यक्त केले. याबद्दल संतोष पिटले व निर्मलाताई संतोष पिटले, यांच्या निवासस्थानी पिटले परिवार व फतेह ग्रुपचे अध्यक्ष जलील शेख यांच्या वतीने किनगाव नगरीच्या लोकप्रिय सरपंचकरुणा धम्मानंद कांबळे व माजी ग्रामपंचायत सदस्य धम्म ानंद कांबळे यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी फतेह ग्रुपचे अध्यक्ष जलील शेख, अलीम मनियार संतोष पिटले, समीर बागवान इमरान शेख, अनवर शेख, खलील शेख, शिवाजी कोलपुसे, असलम शेख मुस्ताक शेख, मोहसीन शेख, अजर शेख ,समीर तांबोली बिलाल, शेख, जाहेद शेख, नारायन पिटले, शिवाजी क्षीरसागर,लहू क्षीरसागर, सोहेल शेख व तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.